नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक २३/०४/२०२६ (गुरूवार )

## अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद
## ३ वाहनासह ३० ब्रास रेती एकुण ९१ लाख ५० हजार रूपयांचा मुद्देमाल जप्त
## पारशिवणी पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन पारशिवनी** :— दिनांक २२/०४/२०२६ रोजी पारशिवनी पोलीस पेट्रोलींग करीत असतांना पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की,मौजा वाघोडा शिवारात पेंच नदीचे पात्रातुन अवैधरीत्या विनापरवाना रेतीचे उत्खनन करून ट्रक द्वारे डोरली मार्गे सिंगोरी कडे वाहतुक करीत आहेत. मिळालेल्या माहितीच्या आधारे पोलीसांनी मौजा सिंगोरी येथे डोरली ते सिंगोरीकडे जाणाऱ्या सिमेंट रोडवर नाकाबंदी केली असता संशयित वाहन क्रं १) टाटा १२ चक्का ट्रक क्रमांक एम. एच.४०/डी.सी. ६३६३, २) टाटा १२ चक्का ट्रक क्रमांक एम. एच ४०/डी.सी ६७८६ आणि वाहन क्रं ३) टाटा १२ चक्का विना क्रमांचा ट्रक मिळून आल्याने वाहन थांबवुन वाहनाची पाहणी केली असता त्यामध्ये रेती आढळुन आली. वाहन क्रं १ चा **चालक आरोपी क्रं १) नामे सोनुलाल मंगलसिंग उईके, वय ३२ वर्ष, रा. ग्राम बंजी पोस्टे अहमदपुर, तह. बिछीया, जि. मंडला, राज्य मध्यप्रदेश, ह.मु नागपुर,** वाहन क्रं २ चा चालक **आरोपी क्रं २) नर्बदे छुन्नुलाल यादव, वय ३० वर्ष, रा. ग्राम बरखेडा, पोस्टे औरई, तह. अंजनीया, जि. मंडला, राज्य मध्यप्रदेश आणि** वाहन क्रं ३ चा चालक आरोपी **क्रं ३) नामे राकेशकुमार अशोककुमार केराम, वय २२ वर्ष, रा. ग्राम सारस डोळी, पोस्ट बिछीया, तह बिछीया, जिल्हा मंडळा, राज्य मध्यप्रदेश, ह.मु नागपुर** हे मिळुन आले. पोलीसांनी आरोपी चालकांना रेती वाहतूकीच्या परवान्याबाबत विचारपुस केली असता त्यांच्याकडे कोणताही परवाना नसल्याबाबत माहीती प्राप्त झाली. **तिन्ही वाहनाचा**

**मालक आरोपी क्रं ४) मनिषराव चौधरी, रा. वाडी नागपुर हा असल्याची माहीती पोलीसांना समजली.** पोलीसांनी पंचासमक्ष वर नमुद तिन्ही वाहन अनुक्रमे १) टाटा १२ चक्का ट्रक क्रमांक एम. एच.४०/डी.सी. ६३६३ किंमती ३०,००,०००/—रूपये व त्याचे डाल्यामध्ये १० ब्रास रेती किंमती ५०,०००/—रूपये २) टाटा १२ चक्का ट्रक क्रमांक एम.एच. ४०/डी.सी. ६७८६ किंमती ३०,००,०००/— रुपये व त्याचे डाल्यामध्ये १० ब्रास रेती किंमती ५०,०००/—रुपये ३) टाटा १२ चक्का विना क्रमांचा ट्रक किमंती ३०,००,०००/—रुपये व त्याचे डाल्यामध्ये १० ब्रास रेती किमंती ५०,०००/— रुपये असा एकुण ०३ ट्रक किंमती ९०,००,०००/— रुपये व एकुण ३० ब्रास रेती किंमती १,५०,०००/— रुपये असा एकुण ९१,५०,०००/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला.

**नमुद आरोपी वाहन चालक १) सोनुलाल मंगलसिंग उईके, वय ३२ वर्ष, रा. ग्राम बंजी पोस्टे अहमदपुर, तह. बिछीया, जि. मंडला मध्यप्रदेश, ह.मु नागपुर २) नर्बदे छुन्नुलाल यादव, वय ३० वर्ष, रा. ग्राम बरखेडा, पोस्टे औरई, तह. अंजनीया, जि. मंडला, मध्यप्रदेश ३) राकेशकुमार अशोककुमार केराम, वय २२ वर्ष, रा. ग्राम सारस डोळी, पोस्ट बिछीया, तह बिछीया, जिल्हा मंडळा, मध्यप्रदेश, ह.मु नागपुर आणि आरोपी वाहन मालक क्रं ४) मनिषराव चौधरी रा. वाडी नागपुर यांच्या विरूध्द पोस्टे पारशिवनी येथे कलम ३०३(२), ४९ भा.न्या.सं, सहकलम ४८(८), ४८(७) महाराष्ट्र जमीन महसुल संहीता, सहकलम ४, २१ खाण खनिज अधिनियम, सहकलम ३ सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान अधिनियम अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तिन्ही वाहन चालक आरोपींना अटक करण्यात आली आहे.**

## नागपूर ग्रामीण जिल्हयात अवैध जुगार चालवणाऱ्यांवर ०२ गुन्हे नोंद

दिनांक २२/०४/२०२६ रोजी महाराष्ट्र जुगार कायदा अंतर्गत पोलीस स्टेशन रामटेक आणि बुटीबोरी यांनी अवैधरित्या सट्टापट्टी खेळणाऱ्या आरोपीतांवर छापा टाकुन सट्टापट्टी

साहित्य व रोख रक्कम असा एकुण १५३३/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला. महाराष्ट्र जुगार अधिनियमान्वये एकुण ०२ गुन्हे दाखल करण्यात आले आहे. ते खालीलप्रमाणे.

पोलीस स्टेशन रामटेक अंतर्गत मौजा मनसर येथे **आरोपी नामे अमर मंगल ईडपाची, वय २७ वर्ष, रा. वार्ड क्र. ०१, नित्यानंद नगर मनसर, त. रामटेक** हा कागदावर वरली मटक्याचे आकडे लिहुन सट्टापट्टी चालवित असताना मिळुन आल्याने त्यांचे ताब्यातून सट्टापट्टी साहित्य व नगदी ९१०/— रूपये असा एकुण ९१३/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. तसेच पोलीस स्टेशन बुटीबोरी अंतर्गत मौजा बुटीबोरी मच्छी मार्केटचे मागे येथे आरोपी **नामे अविनाश सुभाष डुंभरे, वय ५५ वर्ष, रा. प्रभाग क्र ०५, बुटीबोरी** हा कागदावर वरली मटक्याचे आकडे लिहुन सट्टापट्टी चालवित असताना मिळुन आल्याने त्यांचे ताब्यातून सट्टापट्टी साहित्य व नगदी ६२०/— रूपये असा एकुण ६२०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

## अवैधरित्या विनापरवाना दारू काढणारे, दारू बाळगुण विक्री करणाऱ्या तसेच सेवन करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध १८ गुन्हे नोंद

नागपुर ग्रामीण जिल्हयात दिनांक २२/०४/२०२६ रोजी दारूबंदी कायदा अंतर्गत विविध पोलीस स्टेशनला पोलीसांनी अवैधरित्या दारू बाळगुन विक्री करणाऱ्यांवर छापा टाकुन **मोहाफुल दारू, मोहाफुल रसायन सडवा, देशी दारू तसेच इतर साहित्य असा एकुण ७१,९४०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला.** महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमान्वये एकुण १८ गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

**पोलीस स्टेशन कोंढाळी** येथे आरोपी नामे १)धीरसिंग बद्री पवार वय ६० वर्ष रा जुनापाणी, २) सुरेश बाबाराव धांडे वय ४९ वर्ष रा. जलालखेडा यांचेवर प्रत्येकी ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन जलालखेडा** येथे आरोपी नामे १)अभिषेक ज्ञानेश्वर कुमरे वय २५ वर्ष रा. घोगरा ता. नरखेड आणि २) निकी राजेद्र सोमकुवर वय २७ वर्ष रा. खडकी ता. नरखेड याचेवर प्रत्येकी ०१ गुन्हा असे ०२ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन नरखेड** येथे आरोपी नामे १) धनराज शामराव गजभिये वय ६३ वर्ष रा. खरसोली तह. नरखेड जिल्हा नागपूर, २) अभय चंद्रशेखर बांगर वय २१ वर्ष रा. मन्नाथखेडी तह. नरखेड ह. मु. खरसोली तह. नरखेड यांचेवर १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन कळमेश्वर** येथे आरोपी क्र. १ भानु व्यंकटेश रंगु वय

३५ वर्ष रा प्लॉट नं ५ संत  नरहरी लेआउट कळमेश्वर आणि १ महिला आरोपी यांचेवर प्रत्येकी ०१ असे एकुण २ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन खापा** येथे आरोपी सलीम रहमान शाहा वय ५१ वर्ष रा.कोदेगाव याचेवर १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन केळवद**  येथे महिला आरोपी हिचेवर ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन सावनेर** येथे आरोपी नामे १) आयान साबिर सय्यद वय २१ वर्ष राा वाार्ड क्र १२ सावनेर ता सावनेर आणि २) लक्ष्मण सुखलाल साहु वय २४ वर्ष रा वार्ड क्र ११ सावनेर,ता सावनेर यांचेवर प्रत्येकी ०१ गुन्हा असे ०२ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन रामटेक येथे महीला** आरोपी हीचे वर ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन बुटीबोरी** येथे आरोपी नामे १) आझादसिंग हरभजनसिंग बावरी वय २३ वर्ष रा रूईखैरी, २) नामदेव देवराव मरकाम वय ७५ वर्ष रा तुमडी  आणि आरोपी क्र ३)  राजु रामकृष्ण वरकाडे वय ५२ वर्ष रा तुमडी  यांचेवर प्रत्येकी ०१ गुन्हा असे ०३ गुन्हे नोंद आहे. **पोलीस स्टेशन बेला** येथे आरोपी नरेश महादेव माहुरे वय ४० वर्षे रा. मातामदीर वार्ड हिंगणघाट ता. हिंगनघाट जि वर्धा याचेवर १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन वेलतुर** येथे आरोपी अंकुश बाबाजी बावने वय ४६ वर्ष रा.वार्ड क्र ०४ पचखेडी ता कुही याचेवर १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन वेलतुर** येथे आरोपी अंकुश बाबाजी बावने वय ४६ वर्ष रा.वार्ड क्र ०४ पचखेडी ता कुही याचेवर १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन उमरेड** येथे महिला आरोपी हिचेवर ०१ गुन्हा नोंद अशा २२ आरोपीतांवर महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमान्वये १८  गुन्हे दाखल केले आहे.

**नमुद कारवाईत एकुण १) १०४ लिटर मोहाफुल गावठी दारू, २) १६०० लिटर मोहाफुल रसायन सडवा  ३) ५०४० मिली देशी दारू, ३६० मिली विदेशी दारू, तसेच इतर साहित्य असा ७१,९४०/— रूपयांचा मुद्देमाल मिळून आल्याने नाशवंत मुद्देमाल मौक्यावर पंचनामा कार्यवाही करून नष्ट करण्यात आला**

मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने